प्रेसनोट

**ब्युटी पार्लर व्यवसाय करणा-या महिलांशी व्यवसायाचा बहाणा करुन, सोशल मिडीयाचा वापर करुन, त्यांचेशी गैरवर्तणुक करणारा आरोपी सागर गजानन कोळेकर यास खडक पोलीस ठाणेकडुन जेरबंद करण्यात आले.**

--oo--

खडक पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात ब्युटी पार्लरचा व्यवसाय करणा-या महिलेशी, आपले नाव राहुल कुलकर्णी उर्फ संदीप कोळेकर असे सांगणा-या अनोळखी इसमाने त्याचेकडील मोबाईलद्वारे, ब्युटी पार्लरचा व्यवसाय करणा-या महिलेशी ओळख वाढवुन, व्यवसायाचा बहाणा करुन, मोबाईल, व्हॉट्सअपद्वारे त्यांचेशी अश्लिल संभाषण करुन, त्यांचे व्हॉट्सअपवर अश्लिल फोटो टाकुन, बदनामी करण्याची धमकी देऊन, त्याबदल्यात पैशाची मागणी केलेबाबत खडक पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद होता.

गुन्ह्याचा तपास श्री. राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस ठाणे हे करीत असताना, हाताखालील सहा. पोलीस निरीक्षक, श्री. व्ही.डी. केसरकर व स्टाफ यांना गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध घेणेबाबत श्री. राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस ठाणे यांनी आदेश दिले होते. त्या अनुषंगाने दिनांक ०८/१२/२०१७ रोजी, सहा. पोलीस निरीक्षक, श्री. व्ही.डी. केसरकर, यांनी आरोपीने गुन्ह्यात वापरलेल्या मोबाईलचा सी.डी.आर. एस.डी.आर. हे मोबाईल कंपन्यांकडुन प्राप्त करुन, त्याचे अवलोकन करुन, तसेच इतर तांत्रिक बाबींची पडताळणी करुन, नमुद आरोपीचा हाताखालील स्टाफ पो.ना. मानकर व पो. ना. क्षिरसागर यांचे मदतीने शोध घेत असताना, नमुद आरोपी हा शंकरशेठ रोड येथील जानकी लॉज येथे येणार असल्याची माहिती सहा. पोलीस निरीक्षक, श्री. केसरकर यांना मिळाल्याने त्यांनी तात्काळ सदर बातमी गुन्ह्याचे तपास अधिकारी श्री. राजेन्द्र मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना कळविली असता, त्यांनी तात्काळ सदर ठिकाणी जाऊन, योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत सहा. पोलीस निरीक्षक, श्री. केसरकर यांना आदेश दिले. त्याप्रमाणे सहा. पोलीस निरीक्षक, श्री. केसरकर यांनी सदर ठिकाणी जाऊन आरोपीबाबत माहिती प्राप्त करता, सदर ठिकाणी सागर गजानन कोळेकर, वय २८ वर्षे, व्यवसाय- काही नाही, रा. १८७९, डी वार्ड, लोणार गल्ली/तेली गल्ली, विठ्ठल मंदीरासमोर, शनिवारपेठ, कोल्हापुर, सध्या रा. जानकी लॉज, शंकरशेठ रोड, पुणे हा मिळुन आल्याने, त्याचेकडे गुन्ह्याबाबत चौकशी करता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली असुन, सदर आरोपी हा मुळचा कोल्हापुर येथील राहणारा असुन, तो सध्या शंकरशेठ रोड येथील जानकी लॉज येथे स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत होता. गुन्हा दाखल झालेपासुन १५ दिवस तो फरार होता. सदर आरोपीने अशाचप्रकारे पुणे शहरात ब्युटी पार्लरचा व्यवसाय करणा-या महिलांना लक्ष्य केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न होत असुन, अशाप्रकारे त्रास झालेल्या महिलांनी त्याबाबत खडक पोलीस ठाणे येथे संपर्क करण्याचे आवाहन खडक पोलीस ठाणेतर्फे करण्यात आलेले आहे.

सदर कारवाईमध्ये श्री. बाजीराव मोहिते, सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेन्द्र मोकाशी, व.पो.नि. खडक पो.ठाणे, श्री. व्ही.डी. केसरकर, स.पो.नि. श्री. व्ही. एस. पवार, स.पो.नि. श्री. उमेश मानकर, पो.ना. ३७६०, श्री. राकेश क्षिरसागर, पो.शि. ८११३ यांनी सहभाग घेतला आहे.